## नियमित दिवाणी दावा क्रमांक १६५/२०२३ मधील नि.क्र.२५ वरील आदेश

१.  प्रस्तुतचा अर्ज, वादीतर्फे प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, मयत प्रतिवादी महादेव शिदू घार्गे हे दावा चालू असताना दिनांक १९.०८.२०२३ रोजी मयत झाले आहेत. ते मयत झाल्याची बाब वादीला नुकतीच समजली आहे. त्यांचे पश्चात दावा चालविण्याचा त्यांचे वारसांचा कायदेशीर हक्क असल्याने दाव्याकामी त्यांचे वारस अभिलेखावर घेणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे. वादी यांना प्रतिवादी कोठे मयत झाले याची माहिती नसल्याने मृत्युचा उतारा वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे प्रतिवादी चे वारस अभिलेखावर घेण्यास १ वर्षे, १०महिने एवढा उशीर झालेला आहे. सबब, प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळावा अशी विनंती केली आहे.

२.  प्रतिवादी यांनी निशाणी ३१ वर म्हणणे सादर करुन अर्जास हरकत घेतली. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार, अर्जात नमूद केलेले कारण योग्य व बरोबर नाही. प्रतिवादीचे सरनाम्यातील नाव दुरुस्त केल्याशिवाय वादीचा अर्ज कायद्याने चालू शकत नाही. वादीस वारस अभिलेखावर घेण्यास इतका उशीर का झाला याचे कारण नमूद केले नाही.अर्जामध्ये नमूद केलेली कारणे चुकीची व लबाडीची आहेत. सबब अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

३.  प्रतिपक्षाच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांस त्यापुढे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागणी केल्यानुसार प्रतिवादी चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होण्यास व अबेटमेंट सेटअसाईड होऊन मिळण्यास पात्र आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### का र ण मि मां सा

४.  वादी व प्रतिवादींचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द वादीच्या दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये व निरंतर ताकीदिसाठी दाखल केला आहे. अर्जातील कथनांवरुन वादी यांना प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झाला आहे. प्रतिवादीचे वारसांना त्याचे पश्चात दावा चालविण्याचा हक्क असल्याने दावा गुणदोषावर चालणेसाठी प्रतिवादीचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होणे गरजेचे आहे.  सबब मुद्दा नं.१ होकारार्थी देऊन मुद्दा नं. २ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

### आ दे श

१.  अर्ज मंजूर करण्यात येते.

२.  प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब रक्कम रुपये १०००/-चे खर्च वादीने प्रतिवादीस देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

VAIBHAV BAJRANG GHADAGE

Digitally signed by VAIBHAV BAJRANG GHADAGE
Date: 2025.10.28 17:31:54 +0530

( व्ही. बी. घाडगे )

दिनांकः- २८.१०.२०२५

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वडूज.